# आरती श्री कृष्णाची

जय देव जय देव जय वासुदेवा
आरती ओवाळू तुज गोपालकृष्णा
जय देव जय देव ... ॥धृ.॥

शैशवी सेवी ईश दही दूध तूप
शिशुमुखी दावी मातेस भव्य विश्वरूप
किशोर होता रचे रास राधेसह गोप
रक्षी गोप गोपी गोकुळ उचलूनी गेवर्धना
जय देव जय देव ... ॥१॥

सांदीपनीचरणी अर्पी अढळ गुरूनिष्ठा
वधूनी चाणूरकंसा धाडी यमसदनी दुष्टां
सेवूनी सुदाम्याचे पोहे सुहृदा देई प्रतिष्ठा
पुरवूनी वस्त्रे पांचालीला करी कौरवनिर्भत्सना
जय देव जय देव ... ॥२॥

समरी हलवी सूत्रे करी न धरीता शस्त्रांना
सांगूनी गीता पार्था करी धर्मसंस्थापना
योगेश्वर तू युगे युगे प्रकटे सज्जनरक्षणा
नेई उद्धरूनी भक्तजनां नारायणा
जय देव जय देव ... ॥३॥

- नारायण
०६/१९/९७

ॐ
श्री गोपालकृष्ण महाराज की जय।
श्रीकृष्णार्पणमस्तु।
ॐ
नमो भगवते वासुदेवाय हरये परमात्मने।
प्रणत क्लेश नाशाय गोविंदाय नमोऽनम:॥